नि.फौ.ख.क्र.१८/२०२४

सरकार -वि- गणराज **नि.क्र.२२**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – तुळशीदास केशवराव वंजारी

वय. ३० वर्षे, व्यवसाय – बेलदारी,

निवासस्थान – सालई तेली, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सहा. सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फत –</u>**

घटना मागील ३ वर्षांपुर्वी आमच्या शेताच्या बांध्याच्या बाजुला घडली होती. त्यावेळी सकाळचे ९.०० वाजले असतील. त्यादिवशी मी गायी आणण्यासाठी गेलो होतो. त्यादिवशी आरोपी क्र.१ गणराजची व माझी लांबाझोंबी झाली. दुस–या दिवशी माझ्या आईने आरोपी गणराजला हटकले की कां बर माझ्या मुलाला मारले. त्यानंतर आरोपी गणराजने माझ्या आईला सलाखीने कपाळावर मारले. त्यावेळी मी सुध्दा हजर होतो. त्यानंतर मी तिला तुमसर येथील सरकारी दवाखान्यात नेले. त्यानंतर माझी आई पोलिस ठाण्यात गेली होती. ज्या व्यक्तीने माझ्या आईला मारहाण केली होती त्याला मी ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>निशाणी २३ वरील आदेशाप्रमाणे साक्षदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. २०.०७.२०२६ | दि.१२०.०७.२०२६ |